दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १६ वे ● अंक ६६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.३० मे २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## मुरुड तालुक्यातील खारआंबोली ते आगरदांडा महामार्गाची दयनीय

**दै.रायगड नगरी । तळा**

दिल्ली मुबंई कॅरीडोअर रस्ता राष्ट्रीय महामार्ग असून या रस्त्याचे काम बड्या ठेकेदाराला दिले असून हे काम अर्धवट अवस्थेत आहे. मुरूड हे पर्यटन स्थळ असून अनेक पर्यटक येत असतात तर जेट्टी असल्याने व मोठ्या प्रमाणात विकास होत असल्याने जड अवजड वाहनांची सतत वर्दळ वाढली आहे. मुरुड तालुक्यातील खारआंबोली–आगरदांडा हे अंतर फक्त ३ कि.मी. आहे. या मार्गावर अनेक वाहने येत असतात तसेच पर्यटक देखील येत असतात वाहन चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. ५०/६० मीटर लांबीचे भले मोठे खड्यातून कसरत करावी लागत आहे. उपअभियंता सार्वजनिक बांधकामविभाग मुरुड खार आंबोली –आगरदांडा या रस्त्याला प्रचंड खड्डे पडलेले असून अनेक ठिकाणी ना दुरूस्त झाला आहे. मोठा अपघात घडण्याची शक्यता असून त्यानंतरच प्रशासन ठेकेदारावर कारवाई करणार का?पावसाळा जवळ येऊन ठेपला असताना हा रस्ता कधी होणार असा सवाल केला जात आहे. उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग मुरुड याकडे दुर्लक्ष केले जात आहे. सदर काम पावसाळ्यापुर्वी होणे अपेक्षीत असून संबधीत खात्याने लक्ष घालावे अशी मागणी वाहन चालक व स्थानिकांकडून केली जात आहे.

### डॉक्टर्स मैदानात उतरल्याने कोविड मुकाबल्यासाठी बळ वाढले...

# डॉक्टर्सनी वेळीच कोविड लक्षणे ओळखून उपचार सुरु करावेत : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**

पावसाळ्यात काही रोग व साथी उद्भवतात, त्यांची काही लक्षणे आणि कोविडची लक्षणे एकसारखी असतात. त्यामुळे डॉक्टर्सनी त्यांच्याकडे येणाऱ्या रुग्णांमधील कोविडची लक्षणे वेळीच ओळखावीत. तसेच, गृह विलगीकरणातील रुग्णांवर व्यवस्थित उपचार होताहेत किंवा नाही ते बारकाईने पाहावे अशी सूचना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली. ते आज महाराष्ट्र वैद्यकीय परिषद (महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल) ने आयोजित केलेल्या कोरोना संदर्भातील दोन दिवसीय कार्यशाळेच्या उद्घाटन करतांना बोलत होते. कोविडच्या लढाईत आता डॉक्टर्स देखील मोठ्या प्रमाणावर मैदानात उतरले आहेत त्यासाठी मुख्यमंत्र्यांनी प्रथम त्यांचे आभारही मानले. यावेळी वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनीही आपले विचार मांडले.

प्रास्ताविक महाराष्ट्र वैद्यक परिषदेचे अध्यक्ष डॉ. शिवकुमार उत्तुरे यांनी केले तर डॉ. अर्चना पाटे यांनी सूत्र संचलन केले. या ऑनलाईन परिषदेसाठी २१ हजार ५०० डॉक्टर्सनी नोंदणी केली होती. मुख्यमंत्री यावेळी म्हणाले की, गेल्या वर्षी खासगी डॉक्टर्समध्ये देखील कोविड संसर्गाची मोठ्या प्रमाणावर भीती होती, त्यांनी आपले दवाखाने, रुग्णालये बंद ठेवली होती. कारण आपल्याकडे मास्क, पीपीई कीट तसेच इतर आवश्यक वैद्यकीय उपकरणांचा देखील मोठ्या प्रमाणवर तुटवडा होता. परंतु आता या दुसऱ्या लाटेच्या वेळी मोठ्या प्रमाणावर डॉक्टर्स, जनरल फिजिशियन, विविध रोग तज्ञ, मैदानात उतरले आहेत.

आपण माझा डॉक्टर या संकल्पनेतून सातत्याने राज्यभरातील डॉक्टर्सशी संवाद साधत आहोत असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, सर्वसामान्य रुग्ण पहिल्यांदा त्याला कोणताही त्रास झाला की



आपल्या फॅमिली डॉक्टरकडे तपासणीसाठी जातो, हे लक्षात घेऊन त्यांच्यावर मोठी जबाबदारी आहे. कोविड्ची लक्षणे फसवी आहेत. बहुतांश जणांना लक्षणेही दिसत नाही अशा वेळी तुमच्यावर योग्य रीतीने अशा रुग्णास ओळखण्याची जबाबदारी आहे. विशेषत: प्राथमिक आणि मध्यम अवस्थेतील आणि ज्याला रुग्णालयात दाखल करण्याची गरज नाही असा रुग्ण घरीच व्यवस्थित उपचार घेत आहे किंवा नाही ते आपण पहीले पाहिजे. त्याला कधी रुग्णालयात हलविणे आवश्यक आहे त्याकडेही डॉक्टर्सनी काळजीपूर्वक पाहिले पाहिजे.

पूर्वीचा संसर्ग आणि सध्याचा संसर्ग यात फरक आहे. आत्ताचा संसर्ग हा म्युटेशन झालेल्या विषाणूमुळे पसरत असून त्याचा वेग खूप जास्त आहे. शिवाय रुग्णांवरही जास्त काळ उपचार करावे लागत आहेत असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, रोगापेक्षा इलाज भयंकर होऊ नये याचीही काळजी आपल्याला घ्यावी लागणार आहे. म्युकर मायकोसिस वेगाने पसरतो आहे याचाही त्यांनी संदर्भ दिला.

दुसऱ्या लाटेत तरुण वर्गात मोठ्या प्रमाणात संसर्ग दिसतोय तर तिसऱ्या लाटेत बालके संसर्गग्रस्त होऊ शकतात असे सांगून मुख्यमंत्र्यांनी यादृष्टीने अधिक सावधानता बाळ–गली पाहिजे असेही सांगितले. कोविडसंदर्भात लक्षणांत बदल, दिल्या जाणाऱ्या लसी, लस घेणाऱ्यास असलेल्या सहव्याधी, शरीरात तयार होणारी प्रतीरोधक शक्ती याविषयी व्यवस्थित नोंद होणे गरजेचे आहे. राज्य सरकार प्रथमपासून आकडेवारीत कोणतीही लपवाछपवी करीत नाही. त्यामुळे लसीकरणविषयक वरीलप्रमाणे सर्व नोंदी अद्ययावतपणे करीत गेल्यास पुढे चालून अचूक विश्लेषण करणे शक्य होईल व त्याचा फायदा भविष्यात होईल असेही मुख्यमंत्र्यांनी सुचविले.

दोन दिवसीय कार्यशाळेत एकूणच कोविडसंसर्गाचे बदलते स्वरूप, गृह विलगीकरण रुग्णांवरील उपचार, मुलांमधील संसर्ग, तिसऱ्या लाटेचा अंदाज घेऊन तयारी करणे, कोविड लसीकरण, म्युकरवरील इलाज, कोविड व्यवस्थापनातील मुद्दे, प्रयोगशाळेतील चाचण्या, कोविडनंतरचे आजार अशा विविध विषयांवर दोन दिवस ही कार्यशाळा चालणार असून टास्क फोर्समधील तज्ञ तसेच इतरही काही तज्ञ डॉक्टर्स मार्गदर्शन करणार आहेत.

**शिवभोजन बिलासंदर्भात ट्रेझरीमधून विशेष खुलासा**
**वाचा मंगळवारच्या अंकात**

## संक्षिप्त...

### करोनामुळे अनाथ झालेल्या मुलांना मोफत शिक्षण, १० लाख मदत

**नवीदिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी करोनामुळे अनाथ झालेल्या मुलांना मोफत शिक्षण देण्याची घोषणा केली आहे. मोफत शिक्षणासह त्या मुलांच्या वयाच्या २३ व्या वर्षी १० लाख रुपये आर्थिक मदतही दिली जाणार आहे. हा सर्व खर्चा पीएम केअर्स फॉर चिल्ड्रन फंडातून केला जाणार आहे.

करोना महामारीमुळे आपले आई–वडील गमावलेल्या मुलांसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठी घो–षणा केली आहे. शनिवारी पंतप्रधान मोदी यांनी यासंदर्भातील ट्विट केले आहे. ते ट्विटमध्ये लिहितात, 'करोनामुळे आपले आई–वडिल गमावलेल्या सर्व मुलांना 'पीएम–केअर्स फॉर चिल्ड्रन' योजनेतून मदत केली जाईल. अशा मुलांना त्यांच्या वयाच्या १८ व्या वर्षीपासून मासिक स्टायपेंड आणि २३ व्या वर्षी पीएम केअर्समधून १० लाख रुपयांची आर्थिक मदत दिली जाईल.' पंतप्रधान कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, अनाथ झालेल्या सर्व मुलांना नि:शुल्क शिक्षण दिलं जाईल. ज्या मुलांना उच्च शिक्षण घ्यायचं असेल, त्यांना सरकार कर्जासाठी मदत करेल. या कर्जावरील व्याजाची परतफेड पीएम केअर्स फंडातून केली जाईल. याव्यतिरिक्त आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून १८ वर्षांपर्यंतच्या मुलांना पाच लाख रुपयांचा आरोग्य विमा मिळेल आणि त्याचा प्रिमीयम देखील पीएम केअर्स फंडाद्वारे भरला जाईल.

**प्राईम लोकेशनला गाळा विकणे आहे**
पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.
संपर्क : ९८२०३५५३४६

## ना.आदिती तटकरे यांच्या हस्ते रुग्णवाहिकेचे लोकार्पण तसेच लसिकरण व्हॅनचे उदघाटन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

शनिवार दिनांक २९ मे रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास १०२ जननी सुरक्षा योजने अंतर्गत माणगांव उपजिल्हा रूग्णालय येथे राज्याच्या उद्योग आणि खनिकर्म, पर्यटन, फलोत्पादन, क्रीडा व युवक कल्याण, राजशिष्टाचार, विधी व न्याय, माहिती व जनसंपर्क, राज्यमंत्री तथा पालकमंत्री ना. कु. आदिती तटकरे यांच्या शुभहस्ते रुग्णवाहिकेचे पुजन करुन लोकार्पण करण्यात आले आहे. गरोदर मातांना प्रसुती साठी ने–आण करण्याकरीता ही रूग्णवाहीका मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे.



या कार्यक्रम प्रसंगी तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, नगराध्यक्षा योगिता चव्हाण, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, माजी नगराध्यक्ष आनंद यादव, सर्व नगरसेवक तसेच राष्ट्रवादी पक्षाचे महिला तालुका अध्यक्षा संगीता बक्कम, शहराध्यक्ष धुंदवारे, युवक तालुकाध्यक्ष रूपेश तोडकर, माणगांवच्या प्रांताधिकारी प्रशाली दिघावकर–जाधव माणगांव तहसीलदार प्रियांका आयरे–कांबळे, वैद्यकीय अधिक्षक प्रदीप इंगोले, उपजिल्हा रुग्णालय कर्मचारी व राष्ट्रवादी काँग्रेस पदाधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच सध्या वाढत जाणारा कोरोना संसर्ग व लसीकरणांमध्ये येणाऱ्या अडचणी सहजगत्या सोडविता याव्यात या उद्देशाने २९ मे रोजीच माणगांव तालुक्यातील निजामपूर विळे विभागातील तासगाव आदिवासीवाडी येथे रायगड जिल्हा परिषद व स्वदेस फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमानाने मोबाईल लसीकरण व्हॅनचे उद्घाटन देखिल राज्यमंत्री तथा रायगड जिल्हा पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष सुभाष केकाणे, महाड विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष बाबूशेठ खानविलकर, जि. प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी किरण पाटील, पोलिस निरीक्षक, सरपंच, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी आदी. उपस्थित होते

## कत्तलीसाठी तीन गोवंश बैल नेणारा पिकअप टेम्पो पकडला; तिघे अटक

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील ग्रामीण भागातून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कशेडी घाटाला पर्यायी रस्ता असलेल्या ओंबळी खेड रस्त्यावरून रत्नागिरी जिल्ह्यात तीन गोवंश बैलांना घेऊन प्राणी अवैध वाहतूक करणारा पिकअप टेम्पो पोलादपूर पोलीसांनी तीन व्यक्तींसह गुरूवारी मध्यरात्री ११ वाजता ताब्यात घेतला. याप्रकरणी शुक्रवारी पहाटे साडेतीन वाजता गुन्हा दाखल होऊन सकाळी सात वाजण्याच्या सुमारास तीनही आरोपींना अटक करण्यात आली.

पांगळोली पैठण येथील राहूल दगडू कदम (२६,चालक) याने दिलेल्या फिर्यादीनुसार, गुरूवारी रात्री पिकअपटेम्पो (एमएच ०६ पीजी ४९७५)मधून तीन गोवंश बैल घेऊन कोणतीही वैद्यकीय तपासणी अथवा प्रमाणपत्र न बाळगता दोन जना–वरांमध्ये आवश्यक तेवढे अंतर न ठेवता, जनावरांना दुखापत न होण्याबाबत दक्षता न घेता, जनावरांची देखभाल करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची नेमणूक न करता हयगयीने कत्तलीच्या हेतूने संशयितरित्या वाहतूक करताना आरोपी असिफ अस्लम तिवडेकर(वय२५), सिराज हुसैन जोगिलकर(वय ३६) आणि सिराज म्हामून जोगिलकर (वय ४०) तिघेही राहणार खांबेश्वरवाडी, ता.पोलादपूर, जि.रायगड हे कशेडी घाटाला पर्यायी रस्ता असलेल्या ओंबळी खेड रस्त्यावरून रत्नागिरी जिल्ह्यात जाताना गुरूवारी मध्यरात्री ११ वाजता पोलादपूर पोलीसांनी ताब्यात घेतले.

तीनही आरोपींविरूध्द प्राणी संरक्षण अधिनियम, १९५५चे कलम ५, प्राण्यांसोबत क्रूरतेने वागण्यास ..../२

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त मदतीचा ओघ कायम

**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रविवार दिनांक ३० मे रोजी केवाळे, चिखले, वाजे ग्रामपंचायत, सांगडे, कामोठे गुरुद्वारा, चिंचपाडा वाडी, कोल्ही(कोपर), दापोली, कुंडेवहाळ, कोळखे, नांदगाव, तळोजा फेज १, भानघर, जांभिवली, उसर्ली (रिटघर) आदी गावातील गरजूंना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे.



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७० वा वाढदिवस आहे. वैश्विक महामारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रमाला सोमवारपासून प्रारंभ झाले. भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या सुयोग्य नियोजनातून तालुक्यातील गावागावांमध्ये गरजूंना अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे.

## जम्बो ऑक्सिजन सीलिंडर व ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर पनवेल तहसीलदार कार्यालयाकडे सुपुर्द

### तहसीलदार विजय तळेकर यांच्या हस्ते वैद्यकीय उपकरणांचे उपजिल्हा रुग्णालयास हस्तांतरण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

विविध उपाययोजना आणि निर्बंधांमुळे आटोक्यात आलेली कोरोना रुग्णांची संख्या मात्र कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत पुन्हा वाढू लागली. वाढत्या कोरोना रुग्णसंख्येमुळे आरोग्य व्यवस्थेवर मोठा ताण पडत आहे. परिणामी रुग्णांनाही ऑक्सिजनची कमतरता भासू नये यासाठी प्रशासकीय यंत्रणा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. पनवेल तालुक्यातील कोरोना रुग्णांची वाढणारी संख्या व त्यातील गंभीर रुग्णांना ऑक्सीजन लावण्यासाठी लागणारी वैद्यकीय उपकरणाची कमतरता लक्षात घेवून पनवेलमधील उपजिल्हा रुग्णालयातील गरीब व गरजू रुग्णांसाठी रायगडच्या जिल्हाधिकारी श्रीम. निधी चौधरी यांनी केलेल्या आव्हानाला प्रतिसाद देत तळोजा येथील हिन्दालको इन्डस्ट्री लि. आदित्य बिर्ला ग्रुप यांच्या सी.एस.आर फंडातून २० जम्बो ऑक्सीजन सीलिंडर व २० ऑक्सीजन कॉन्सन्ट्रटर खरेदी करून तहसीलदार कार्यालय पनवेल यांच्याकडे सुपुर्द करण्यात आले. ..../२

## भाजपातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी केला शिवसेनेत प्रवेश

### शिवसेना हा शब्दाला जागणारा पक्ष असून दिलेले आश्वासन पूर्ण करणार : खा.श्रीरंग बारणे



**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना हा शब्दाला जागणारा पक्ष असून येत्या २ ते ३ महिन्यात या विभागातील पाण्याचा प्रश्न, जलकुंभ, रस्ता कॉंक्रीटीकरणाचा प्रश्न निकाली काढणार. भाजपने फक्त गेल्या २५ वर्षात या विभागाला आश्वासनाची खैरात दिली व मत घेतली. परंतु शिवसेना पहिले वचनपूर्ती करणार व मग हक्काने मते मागणार असे प्रतिपादन शिवसेना खा.श्रीरंग बारणे यांनी आज पालेबुद्रुक परिसरातील भाजपाचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांनी शिवसेनेत प्रवेश केल्याबद्दल त्यांचे स्वागत करताना केले.

पालेबुद्रुक येथील पक्षप्रवेश तसेच जलकुंभ उद्घाटन जिल्हाप्रमुख शिरिष घरत यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने संपन्न झाला. यावेळी ..../२

## जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर जास्तीत जास्त भर : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

जिल्हा परिषद रायगड आणि स्वदेश फॉउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोविड –१९ लसीकरण मोहीमआणि पालक मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रयत्नामुळे म्हसळा तालुक्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र खामगांव आणि ग्रामिण रुग्णालय म्हसळा साठी आलेल्या ऍम्ब्युलन्स चा लोकार्पण सोहळा म्हसळा म्हसळा ग्रामिण रुग्णालयात संपन्न झाला.



तत्पूर्वी पालक मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तालुक्यातील चिखलप आदिवासी वाडी येथे कोविड –१९ लसीकरण मोहिमेचे उदघाटन पालकमंत्र्याच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस चे जेष्ठ नेते अलिशेठ कौचाली, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.किरण किरण पाटील, उपविभागीय प्रांत अधिकारी अमित शेडगे, स्वदेश फॉउंडेशन चे अधिकारी तुषार इनामदार, जिल्हा परिषदेचे कृषी आणि दुग्ध व्यवसाय सभापती बबन मनवे, तहसीलदार शरद गोसावी, पोलीस निरीक्षक उद्धव सुर्वे, सभापती छाया म्हात्रे, उपसभापती संदिप चाचले, तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस अध्यक्ष समिर बनकर, माजी सभापती उज्वला सावंत, ..../२

# वर्धा, गडचिरोली बाकी है...

काँग्रेस हा जनसामान्यांचा पक्ष आहे. या पक्षाला सर्वमान्यता लाभण्यामागे ऐतिहासिक घोषणांची पार्श्वभूमी आहे. 'करो या मरो' ही घोषणा स्वातंत्र्यकाळात गाजली होती. गांधीजींनी मिठासाठी दांडी सत्याग्रहाची घोषणा दिली, तेव्हा ब्रिटिशांनी आधी दुर्लक्ष केले. काँग्रेसचे हसे होईल या जाणिवेतून मोतिलाल नेहरूंनीही गांधीजींना पत्र लिहिले. सत्याग्रह स्थगित करण्याची सूचना केली. गांधीजींनी दोन शब्दांची नवी घोषणा लिहून दिली, 'करके देखो!' पुढे दांडी सत्याग्रहाने ब्रिटिश साम्राज्याचा पाया खचविला, हा इतिहास सर्वांना ठाऊक आहे. नव्या घोषणांनी नवा इतिहास घडतो. काळानुसार घोषणा बदलतात. चळवळी सर्वव्यापी करण्याचे काम घोषणा करतात. चंद्रपूरची सत्ता हस्तगत करताच 'दारूबंदी नही चलेगी' अशी घोषणा काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. काँग्रेसजनांचे सगळे थेट असते. लपून वार करणार नाही, ही भूमिका वडेट्टीवारांनी पाळली. पालकमंत्री या नात्याने त्यांना चंद्रपुरातील बुडणाऱ्या महसुलाचे मोठे दुःख होते. प्रारंभीपासूनच त्यांनी दारूबंदी हटविण्याचा चंग बांधला. करोनाकाळातील त्यांच्या मुंबईवाऱ्यांचा मुख्य कार्यक्रमही 'दारूबंदी हटाव' हाच होता. तत्कालीन उत्पादन शुल्क मंत्री दिलीप वळसे पाटील यांना त्यांनी तसे पत्र लिहिले. अवैध दारूविक्री आणि बनावट दारूमुळे 'निष्पाप नागरिकांचे' मृत्यू ओढवत असल्याची कळकळ त्यांनी प्रकर्षाने मांडली. बनावट दारू पिऊन बळी जाण्यापेक्षा, अधिकृत दारू पिऊन लोक गेलेले बरे, अशी कदाचित काँग्रेसची नवी भूमिका असावी. महात्मा गांधींचे वास्तव्य सेवाग्रामला होते, म्हणून वर्धा जिल्ह्यात सर्वांत आधी दारूबंदी करण्यात आली. त्यानंतर आदिवासी जिल्हा म्हणून गडचिरोलीत आणि अनेक आंदोलनांनंतर चंद्रपुरात २०१५मध्ये दारूबंदी लागू झाली. त्यासाठी, चिमूर ते नागपूर अशी ग्रामीण महिलांची पदयात्रा नागपूर विधानसभेने बघितली. भुकेल्या महिलांना बघून व्यथित झालेल्या तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांची कळकळ तेव्हा अनेकांनी अनुभवली. सुधीर मुनगंटीवारांनी विधानसभेत मागणी रेटली. पारोमिता गोस्वामींच्या 'श्रमिक एल्गार'ने रान उठवले. २०११मध्ये संजय देवतळे समितीने चंद्रपुरातील दारूबंदीची शिफारस केली. तत्पूर्वी, समितीने वर्षभर अभ्यास केला. चंद्रपूर जिल्ह्यातील सहाशे ग्रामपंचायती आणि जिल्हा परिषदेने प्रस्ताव पाठवून जिल्ह्यातील दारूबंदीला नैतिक अधिष्ठान मिळवून दिले होते. वडेट्टीवारांचे कोणतेही काम वेगवान असते. त्यांनी २७ जानेवारीला मंत्र्यांना पत्र दिले. पाच फेब्रुवारीला दारूबंदी आढावा समिती आली. सव्वा महिन्यात, १६ मार्चला समितीचा अहवाल आला. महत्त्वाच्या शैक्षणिक प्रश्नांना ब्रेक लावणाऱ्या महाविकास आघाडीची ही तीव्र गती अचंब्यात टाकणारी आहे. प्रभावी व्यसनमुक्ती चळवळीसाठी विदर्भात डॉ. अभय बंग, तर कोकणात नानासाहेब धर्माधिकारी यांचे आभार मानणाऱ्या मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना मंत्रिमंडळ बैठकीत कुणी मौनात पाठविले, हे कळायला मार्ग नाही. दारूपासून मिळणाऱ्या महसुलापेक्षा समाजाला मोजावी लागणारी किंमत २५ ते ४० पट अधिक असल्याचे शास्त्रीय निष्कर्ष आहेत. 'चंद्रपूर तो झाँकी है; वर्धा, गडचिरोली बाकी है' अशी नवी घोषणा या निर्णयानंतर विदर्भात काही ठिकाणी निनादली. खरी चिंता ती आहे. दारूबंदीत गुन्हेगारी वाढली, असा अजब तर्क दारूबंदी विरोधकांनी लावला आहे. अडीच लाख लोकांचा दारूबंदीला विरोध असल्याचाही आढावा समितीचा दावा आहे. वडेट्टीवारांच्या पत्रात चंद्रपूरसह गडचिरोलीतील दारूबंदी हटविण्याची मागणी आहे. वर्धेत त्यांचे पक्षबंधू सुनील केदारच पालकमंत्री आहेत. देशात दारूबंदी लागू झाली नाही, तर आपले स्वातंत्र्य गुलामीत परावर्तित होईल, अशी भीती महात्मा गांधींना होती. गांधीजींच्या वचनांचे दाखले देणाऱ्या काँग्रेसची वाटचाल आता बुडत्या महसुलाने हळहळणाऱ्या पालकमंत्र्यांच्या काँग्रेसकडे झाली आहे. अनियंत्रित दारूप्राशन हा मानसिक आजार असूनही निर्धन, अशिक्षित समाजाला त्या खाईत लोटण्याचे पातक सत्तेतील व्यवहारी नेत्यांनी केले आहे. दारूबंदीकडून दारूमुक्तीकडे जाण्याऐवजी, राज्याचा उलटा प्रवास सुरू झाला आहे. या चळवळीतील आणखी एक बाजूही लक्षात घ्यायला हवी. दारूबंदीचे तिन्ही जिल्हे विदर्भात होते. व्यसनांचे सगळे तोटे विदर्भालाच भोगावे लागतात, असे समजायचे कारण नाही. महसुलाचा मुद्दा वारंवार पुढे केला जात असला, तरी नैतिकतेच्या निकषांवर उर्वरित राज्याला मोकळीक आहे, असेही नाही. बंदी असलेल्या जिल्ह्याचे असे अनिर्बंध होणे खेदजनक आहे. पुन्हा व्यसनांच्या गर्तेत ढकलणारी ही कृती आहे. एका जिल्ह्यात भावलेल्या आकड्यांनी नेत्यांना उर्वरित जिल्ह्यांचेही स्वप्न देऊ केले आहे. थोडक्यात, राज्यातील दारूबंदीला घरघर लागली आहे. 'कर के देखो' या घोषणेची 'झाँकी' महाविकास रणनीतीला चंद्रपुरात दिसली आहे. 'वर्धा, गडचिरोली बाकी है' ही भीती त्यातच दाटली आहे.

# डॉ. प्रियांका देशमुख यांचे काम कौतुकास्पद: गावोगावी जाऊन देत आहेत कोविशिल्डचा डोस

**दै.रायगड नगरी । म्हसळा**



लॉक डाऊन काळात सार्वजनिक वाहतूक बंद असून तालुक्याचा ठिकाणी कोरोना लस घेण्यासाठी येणे हे खेडेगावातील नागरिकांसाठी मोठे आर्थिक भुर्दंड सारखे वाटत आहे. त्यामुळे लसीकरणावरही याचा मोठा परिणाम दिसून येतो.मात्र म्हसळा प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ.प्रियांका देशमुख या आपल्या टीम सोबत गावोगावी जाऊन नागरिकांचे लसीकरण करत असल्याने तालुकास्तरावर त्यांचे कौतुक होत आहे.

कोरोनाच्या दुसऱ्या लाटे पासून वाचायचे असेल तर दो गज की दुरी मास्क है जरुरी सोबत कोरोनाची लस घेणेही आवश्यक आहे. शासनातर्फे कोरोनापासून बचावासाठी लसीकरणावर जोर देण्यात आला असला तरी, सर्वसामान्यांसाठी लसीकरण करून घेणे कठीण झाले आहे. लॉक डाऊन काळात सार्वजनिक वाह–तूक बंद असून सर्वसामान्यांचा रोजगार देखील गेला आहे. हातामध्ये खाण्यासाठी पैसे नसताना लस घेण्यासाठी खाजगी वाहतूक करून लसीकरण केंद्रावर जाणे हे आवाक्याचा बाहेरचे आहे.यामुळे म्हसळा तालुक्यातील लसीकरणाची वेग मंदावू लागला होता. मात्र प्र. तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रशांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रियांका देशमुख यांनी आरोग्य सेविका ज्योती कदम, आरोग्य सेविका गीता, आरोग्य सेवक सागर सायगवकर यांच्या सोबत गावोगावी जाऊन ग्रामपंचायत स्थरावर लसीकरणाची मोहीम हाती घेतली.या मोहिमे अंतर्गत खेडेगावातील नागरिकांना त्यांचा गावा मध्ये कोवीशिल्ड लस उपलब्ध करून देण्याचे काम ही आरोग्य टीम करीत आहे. डॉ. देशमुख यांनी आठवड्यात पाभरा येथे २००, घोणसा येथे १३०, कोकबल येथे ६० व घुम येथे ६० जणांचे लसीकरण करून घेतले आहे.डॉ. गायकवाड व डॉ. देशमुख यांच्या लसीकरण मोहीमेमुळे गावागावात जनजागृती निर्माण झाली असून नागरिक स्वतःहून लसीकरणा साठी पुढे येत आहेत.

सध्या कोरोना महामारीत अनेक कुटुंब उध्वस्त होत आहेत. मात्र या रोगापासून नागरिकांना वाचण्यासाठी लसीकरण करणे गरजेचे असल्याने म्हसळा पंचायत समितीचे सहायक गट विकास अधिकारी यांनी स्वतःचा कुटुंबाचा विचार न करता त्यांचा पत्नी प्राजक्ता राजेश कदम यांना आरोग्य टीम सोबत लसीकरणासाठी कामामध्ये मदत करण्यासाठी कोकबक व घुम येथे पाठवले होते.

# प्रत्येक समाजाने एकमेकांच्या सुखदु:खात सहभाग घेवून सौजन्याने वागणे गरजेचे : रवींद्र दौंडकर

**दै.रायगड नगरी । पनवेल**



सर्वच समाजातील लोकांनी जातीय सलोखा वाढविण्याचा प्रयत्न करावा, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होवून एकमेकांशी सौजन्याने वागणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांनी त्यांच्या कार्यालयात प्रतिष्ठीत नागरिक, समाजसेवक, शांतता कमिटी सदस्य, मोहल्ला कमिटी सदस्य यांच्या घेतलेल्या एकत्रित बैठकीत मार्गदर्शन करताना केले.

यावेळी बोलताना रवींद्र दौंडकर यांनी सांगितले की, सर्व मोहल्ला कमिटी व शांतता कमिटीवर असणाऱ्या सदस्यांनी गावातील प्रत्येक राजकीय, जातीय धार्मिक कार्यक्रम व चालू घडामोडीबाबत पोलीस ठाण्यात किंवा संबंधित भेट किंवा गोपनीय विभागाला तात्काळ माहिती कळविणे आवश्यक आहे. सर्व मोहल्ला कमिटी व शांतता कमिटीत असणाऱ्या सदस्यांनी कोणत्याही राजकीय पक्षाची किंवा धर्माची एकतर्फी बाजू घेवू नये, गावात तटस्थ भूमिका ठेवून सर्वधर्म समभाव या प्रकारे वागणूक ठेवावी, आपापल्या गावात असणारे हिंदू व मुस्लीम लोकांशी जातीय सलोखा वाढविण्याचा प्रयत्न करावा, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होवून त्यांच्याशी सौजन्याने वागावे. कोरोना महामारीवर घ्यावयाची दक्षता, उपाय योजना व वाढत्या गुन्हेगारी संदर्भात घ्यावयाची काळजी, तसेच संपूर्ण परिसर सीसीटीव्ही नियंत्रणाखाली आणण्याकामी उपस्थितांना त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या.

# वाळवटी एज्युकेशन मंडळाचा मदतीचा हात

**दै.रायगड नगरी । दिघी**



श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटी एज्युकेशन मंडळाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालयाला वैद्यकीय साहित्य वाटप करण्यात आले.

वाळवटी एज्युकेशन मंडळ हे नोंदणीकृत असून मंडळाकडून नेहमीच मदतीचा हात पुढे येत आहे. याच दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकी म्हणून उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन येथे ग्लुकोमिटर, नेबुलाझर व शुगर तपासणी स्ट्रिप्स या वैद्यकीय साहित्याचा वाटप कार्यक्रम मंडळाचे अध्यक्ष भिकू पांगारकर यांचे हस्ते करण्यात आला.

सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय व क्रीडा क्षेत्रांत काम करणाऱ्या वाळवटी एज्युकेशन मंडळाच्या वतीने सांगली व कोल्हापूर महापूर प्रसंगी मदत, कोरोना पार्श्वभूमीवर गरीब, गरजू व आदिवासी कुटुंबाना धान्य व इतर साहित्य वाटप तसेच वाळवटी व दांडगूरी केंद्रातील प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप इ .उपक्रमातून मंडळाच्या वतीने आता पर्यंत सहकार्य लाभले आहे. यावेळी कोरोना रुग्णाच्या मनातील भीती दूर व्हावी याकरिता दोन दिवसांपूर्वी उपजिल्हा रुग्णालयात उपचार घेत असलेल्या ४२ रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. कोरोना आजाराबद्दल भीतीचे वातावरण असताना त्यांना आधार देता यावा, या दृष्टीने फळ वाटप कार्यक्रम करण्यात आला.

या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ.मधुकर ढवळे, उपाध्यक्ष विनायक पारधी, राजेश तोडणकर, राजू भोसले आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. कोरोना रुग्णाच्या उपचारासाठी काही वस्तूंची आवश्यकता असल्यास मंडळाकडे मागणी करावी. असे आवाहन यावेळी मंडळाचे अध्यक्ष भिकू पांगारकर यांनी केले. कोरोना महामारीच्या प्रसंगी रुग्णांना मिळणाऱ्या या मदतीच्या कार्याचे रुग्णालयाकडून कौतुक करण्यात आले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## कत्तलीसाठी तीन गोवंश बैल नेणारा पिकअप टेम्पो पकडला; तिघे अटक

प्रतिबंध करण्याचे १९६०चे कलम ११, प्राणी वाहतूक अधिनियम तसेच मोटारवाहन कायदा कलम ६६(१),१९२ प्रमाणे भा.दं. वि. ३४ अन्वये पोलादपूर पोलीस ठाण्यात गुन्हा र.नं. २०–२०२१ नुसार गुन्हा दाखल करून पोलीस उपनिरिक्षक लोणे यांनी अटक केली असून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ते अधिक तपास करीत आहेत.

## पनवेल तहसीलदार कार्यालयाकडे सुपुर्द

सदर वैद्यकीय उपकरणाचे हिन्दालको इन्डस्ट्री लि. तळोजाचे सुधीर मिश्रा, हेड ऑफ द एच आर आणि आय आर व कंपनीच्या इतर अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या २० जम्बो ऑक्सीजन सीलिंडर व २० ऑक्सीजन कॉन्टरसमक्ष प्रात्यक्षिक करून दाखविले. त्यानंतर २० जम्बो ऑक्सीजन सिलिंडर व २० ऑक्सीजन कॉन्सन्ट्रटर तहसीलदार विजय तळेकर यांच्यासह तहसीलदार कार्यालय पनवेल यांनी पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सचिन संकपाळ यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आले.

सदरच्या वैद्यकीय उपकरणांमुळे पनवेल तालुक्यातील शासकीय रुग्णालयात उपचार घेणा–या गरीब, गरजू रुग्णांना मोठी मदत होणार आहे. यावेळी हिन्दालको कंपनीचे ईलेक्ट्रीक विभागाचे प्रमुख सी. जी. जस्टीन, लहू रौंधळ, सचीन मलगौडी,उपजिल्हा रुग्णालय अधीक्षक डॉ. सचिन संकपाळ नायब तहसीलदार संजीव मांडे, राहुल सुर्यवंशी, एकनाथ नाईक, नालंद गांगुर्डे तसेच तहसील कार्यालयीन कर्मचारी आदी उपस्थीत होते.

## भाजपातील पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी केला शिवसेनेत प्रवेश

खा.श्रीरंग बारणे, जिल्हा सल्लागार बबन पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदासदादा पाटील, महानगरप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, तालुका संघटक रामदास पाटील, उपजिल्हा युवा सेना अधिकारी अवचित राउत, विधानसभा अधिकारी पराग मोहिते, उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, उपतालुकाप्रमुख योगेश ढोपरी, खांदा वसाहत शहरप्रमुख सदानंद शिर्के, नवीन पनवेल शहरप्रमुख रुपेश ठोंबरे, विभाग प्रमुख विश्वास पेटकर, दत्ता भगत, प्रमोद पाटील, उपविधानसभा अधिकारी सुशांत सावंत, विभाग अधिकारी मनोज कुंभारकर, जीवन पाटील आदी उपस्थित होते.

पाले बुद्रुक येथे भाजपचे पदाधिकारी योगेश तांडेल, संदिप तांडेल, नरेश भगत, विद्यमान ग्रामपंचायत सदस्या सौ. सिद्धी संदीप तांडेल यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व महिलांनी आज शिवसेनेमधे जाहीर पक्षप्रवेश केला. खासदार श्रीरंग आप्पा बारणे, शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील ह्यानी शिवबंधन बांधून त्यांचे पक्षात स्वागत केले. यावेळी खा.श्रीरंग बारणे, जिल्हा सल्लागार बबन पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदासदादा पाटील, महानगरप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, तालुका संघटक रामदास पाटील, उपजिल्हा युवा सेना अधिकारी अवचित राउत, विधानसभा अधिकारी पराग मोहिते, उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, उपतालुकाप्रमुख योगेश ढोपरी, खांदा वसाहत शहरप्रमुख सदानंद शिर्के, नवीन पनवेल शहरप्रमुख रुपेश ठोंबरे, विभाग प्रमुख विश्वास पेटकर, दत्ता भगत, प्रमोद पाटील, उपविधानसभा अधिकारी सुशांत सावंत, विभाग अधिकारी मनोज कुंभारकर, जीवन पाटील आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हा सल्लागार बबन पाटील यांनी सांगितले की, कोरोनाच्या काळामध्ये सुद्धा शिवसेनेने अहोरात्र मेहनत केली आहे. स्वतः मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, युवा सेनाप्रमुख पर्यावरणमंत्री आदित्य ठाकरे आदींनी महाराष्ट्रावरील कोरोनाचे संकट दूर होण्यासाठी अत्यंत ताकदीने काम केले आहे. त्यामुळे कोरोना आटोक्यात येताना दिसत आहे. सर्वांनी काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

## जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर जास्तीत जास्त भर

गटविकास अधिकारी वाय. एम. प्रभे, सहाय्यक गटविकास अधिकारी कदम जिल्हा अल्पसंख्याक सेल अध्यक्ष नाजीम हसवारे, डॉ. महेश मेहता, डॉ. गायकवाड, डॉ. अलंकार करंबे, डॉ. प्रियांका देशमुख, संतोष (नाना) सावंत, रेशमा कानसे आदि मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना स्वदेश फॉउंडेशन आणि जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या मोहिमेचे आदिती तटकरे यांनी कौतुक करताना विशेष म्हणजे आदिवासी बांधवांमध्ये खऱ्या अर्थाने जनजागृती करण्याचा प्रयत्न म्हणजे म्हणजे चांगला प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले. शासन पूर्णपणे प्रयत्न करीत असून जनतेनेही गांभीर्याने या कडे लक्ष देऊन सहकार्य करण्याची गरज असल्याचे सांगून आता तालुक्यात दोन ॲम्ब्युलन्स नव्याने दाखल झाल्याने यापुढे ॲम्ब्युलन्स ची कमतरता भासणार नसल्याचे त्यांनी सांगून भविष्यात जिल्ह्याची आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्यावर अधिकाधिक भर देण्याचा निश्चित पणे प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

# भारतीय जनता पार्टी कामगार आघाडीतर्फे आदिवासीवाडीमध्ये अन्न धान्य वाटप

**दै.रायगड नगरी । उरण**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला सात वर्षाचा कार्यकाल यशस्–वीपणे पूर्ण केला असुन संपूर्ण देशात भारतीय जनता पार्टी तर्फे सेवा सप्ताह साजरा केला जात आहे त्याचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी कामगार आघाडी तर्फे उरण तालुक्यातील चिरले जांभुळपाड़ा आदिवासी वाडी बोटकीची वाडी येथेअन्न धान्य वाटपाचा कार्यक्रम भाजपा चे उरण तालुक्याचे अध्यक्ष रवी भोईर यांच्या प्रमुख उपास्थितीत पार पडला. कार्यक्रमाचे संयोजक कामगार आघाड़ी अध्यक्ष उत्तर रायगड हे होते.



वेळी भाजपा उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, भाजपा रायगड जिल्हा उपाध्यक्ष नीलकंठशेठ घरत, उत्तर रायगड कामगार आघाड़ी अध्यक्ष जितेंद्र घरत, भाजपा उरण तालुका सरचिटणीस सुनील पाटील, मोतीराम मढवी, रमणशेठ घरत, राहुल घरत, नंदेश घरत, संदीप पाटील, पंढरीनाथ घरत, चेतन ठाकुर, विश्रांती घरत कुसुम आदी भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# युवकाची फास घेऊन आत्महत्या

**दै.रायगड नगरी । तळा**

कुडा बौध्द वाडीतील निलेश रघुनाथ गायकवाड वय वर्ष ४१याने रागाच्या भरात दारूच्या नशेत राठीची पाखर जंगल भागात झाडाला दोरीने फास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली.

पोलीस सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार पत्नीकडे दारू साठी पैशाची मागणी केली असता तीने नकार दिला होता. तो राग मनात धरून तीन दिवसापासून बेपत्ता झाला होता. सदर इसमाचा तपास करीत असता आत्महत्या केली असल्याचे आढळून आले. आ.मृत्यू र. ३/२०२१ सि.आर. पी.सी.१७४ नोंद करण्यात आली असून पोलीस निरीक्षक सूरेश गेंगजे यांच्या मार्गदर्शना खाली सहा पोलीस निरीक्षक सोनाली जवादे व शिवराज खराडे पुढील तपास करीत आहेत.

# विक्रांत पाटील यांनी अशोक बागमधील ड्रेनेजचा विषय सोडवून नागरिकांना दिला दिलासा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अमरधाम रोड वरील व अंकिता सोसायटी समोरील असलेला अशोक बाग मधील राहणारे रहिवाशी ड्रेनेज च्या विषया वरून त्रस्त होते. पनवेल नगर परिषद असलेल्या काळापासून काही ठिकाणी असलेली ही सांडपाण्याची व्यवस्था काळानुरूप बदल न केल्यामुळे कुचकामी ठरत आहे आणि त्याचा नाहक त्रास रहिवाशांना होत आहे.



हीच परिस्थिती अशोकबाग मध्ये सुद्धा होती. छोटे ड्रेनेज चे चेंबर्स, आठ आठ दिवसांनी तुंबणारे पाणी,सांडपाण्याची येणारी दुर्गंधी यासर्व गोष्टींच्या मुळे अशोक बाग मधील रहिवाशी त्रस्त झाले होते.या बाबत अनेक वेळा महानगरपालिकेत पाठपुरावा आणि पत्रव्यवहार करूनही त्यांचा प्रश्न सुटत नव्हता. शेवटी याबाबत ची तक्रार अशोक बाग च्या रहिवाशांनी नगरसेवक तसेच माजी उपमहापौर विक्रांत पाटील यांच्याकडे त्यांच्या जनसेवा कार्यालयात येऊन केली. अशोक बाग मधील रहिवाशांचा आरोग्यविषयक प्रश्न लक्षात घेता नगरसेवक विक्रांत पाटील यांनी सर्व त्वरित पाऊल उचलत कॉन्ट्रॅक्टरला बोलून घेतले व स्वखर्चाने ड्रेनेज बांधून दिले. आपल्या या प्रलंबित प्रश्नाचे निरसन करून दिलासा दिल्याबद्दल अशोक बाग मधील रहिवाशांनी नगरसेवक विक्रांत पाटील यांना धन्यवाद दिले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## शांतिवन कुष्ठरूग्ण वॉर्डसाठी वॉशिंग मशिन भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील नेरे जवळील कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन येथील कुष्ठरुग्ण वॉर्डसाठी पनवेल मधील हर्षल रविकांत राईरकर यांनी संस्थेची गरज ओळखून वॉशिंग मशिन भेट दिली.

या मशिनचा उपयोग पुरुष व महिला निवासी वॉर्ड मधील चादरी, बेडशिट, पडदे आणि कपडे धुण्यासाठी होईल. यामुळे तेथील कार्यकर्त्यांना कपडे धुण्याचा त्रास होणार नाही तसेच वेळ व श्रमाची बचत होईल. वॉशिंग मशिन भेट देताना राजन साखरकर, गणेश दांडेकर हे उपस्थित होते. संस्थेच्या अध्यक्षा रक्षा मेहता यांच्या सु-चनेनुसार संस्थेच्या कुष्ठरुग्ण वॉर्ड व दवाखान्यासाठी आता पुन्हा संस्थेच्या कामासाठी दर बुधवारी डॉ. प्रणित गोगटे येत आहेत त्यामुळे कुष्ठरुग्णांना आता बरे वाटत आहे.



## नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दाभोळसाठी मौजे दाभोळ येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

महाड तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दाभोळ (पाटीलवाडी) इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे दाभोळ ता.महाड येथील गावठाण क्षेत्र ९-९३-०० हे. आर. या मिळकती पैकी क्षेत्र ०-०४- ४१ हे.आर. ही जमीन ग्रामपंचायत दाभोळ यांच्याकडून शासनाकडे पुर्नग्रहण करुन जमीन महसूल मुक्त व सारामाफीने ही जागा नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, दाभोळ (पाटीलवाडी) करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत. महाड तालुक्यातील ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने ही बाब महत्वाची आहे.

### आमची लढाई सरकारसोबत, कोणत्याही जातींविरोधात नाही

# मराठा आरक्षण व हक्कांबाबत आम्ही कटिबद्ध : शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष अविनाश सावंत

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मराठा समाजाला आरक्षण बाबत योग्य न्याय मिळावा.यासाठीआमची लढाई सरकार सोबत असून मराठा आरक्षण व हक्का बाबत आम्ही कटिबद्ध असल्याची प्रतिक्रिया रायगड जिल्हा शिवसंग्राम संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश सावंत यांनी दिली आहे.

दि.५ मे २०२१ रोजी सुप्रीम कोर्टाने मराठा आरक्षण कायद्याच्या कसोटीवर रद्द केले आणि भविष्यातील लाखो तरुणांचे भविष्य दोलायमान झाले. कित्येक तरुण तरुणींचे मानसिक खच्चीकरण झाले बहुसंख्यांक शेतकऱ्यांची मुले असल्यामुळे कठीण परिस्थितीत शिक्षण घेतले होते. एमपीएससी तथा विविध स्पर्धा परीक्षा मधून निवड मिळवली परंतु आरक्षण गेल्याने या सरकारने कोणालाही नियुक्ती दिली नाही. शिक्षण घेण्यासाठी पैसा नाही. रोजगार नाही, आता तरुणांनी नेमके करायचे काय ? हाच मोठा प्रश्न त्यांच्यासमोर पडलेला आहे. आरक्षणासाठीची विद्यमान सरकारची भूमिका , शिक्षणासाठी आणि रोजगारासाठी विविध योजना, सवलती या व इतर अनेक प्रलंबित मागण्यांसाठी येत्या ५ जूनला बीड येथे सर्व समाजबांधव, विविध संघटना , अनेक राजकीय व सामाजिक संघटना यांच्या जोरदार शक्तिप्रदर्शनाच्या बळावर एक अभूतपूर्व मोर्चा शिवसंग्रामचे संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष माननीय आमदार विनायकराव मेटेसाहेब ह्यांच्या अधिपत्याखाली होणार आहे असे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश सावंत ह्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

नुकतीच ह्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्यभर शिवसंग्राम आणि विविध संघटनांचे प्रमुख पदाधिकारी ह्याची ऑनलाइन मीटिंग होऊन अनेक गोष्टींचा ऊहापोह आणि मोर्चाची रणनीती ठरविण्यात आली. दि.५ जून रोजी सकाळी १०.३० वाजता बीड येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडासंकुल येथून जिल्हाधिकारी कार्यालयावर हा मोर्चा काढण्यात येणार आहे. 'लढा आरक्षणाचा' ही संकल्पना प्रमाण मानून मराठा क्रांती संघर्ष मोर्चा ह्या नावाने हा मोर्चा आयोजित केला असून आमची लढाई ही सरकारसोबत आहे , कोणत्याही जातींच्या विरोधात नाही असे प्राधान्याने स्पष्ट करण्यात आले. आमदार मेटेसाहेब पुढे म्हणाले की, राज्य सरकारच्या मनात नक्कीच पाप आहे त्यामुळेच ते मराठा समाजासाठी काहीच निर्णय करायला तयार नाहीत. सारथी योजनेचे पैसे विद्यार्थ्यांना मिळत नाहीत, आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे काम ठप्प आहे, अनेक शैक्षणिक सोयीसुविधा मिळत नाहीत या व इतर अनेक महत्वाच्या बाबींकडे सरकारचे लक्ष वेधावे ह्यासाठीच कोणत्याही परिस्थितीत हा मोर्चा हजारोंच्या संख्येने पार पडणारच असा ठाम विश्वास त्यांनी बोलून दाखविला.



जिल्हाध्यक्ष अविनाश सावंत पुढे म्हणाले की, समाजाच्या प्रश्नांवर कोणीही विरोध करू नका, आरक्षण आणि हक्क ही काळाची गरज आहे. गरीब मराठ्यांना आरक्षणाचे संरक्षण देऊन त्यांचे जीवनमान इतर बहुजनांच्या पातळीवर आणण्यासाठी गेली ३५/४०वर्षे समाजाने जबर संघर्ष केला. राजकीय, सामाजिक, रस्त्यावरची, न्यायालयीन इ. सर्व पातळीवर प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अनेकांनी प्राणार्पण केले पण अजूनही हा समाज केवळ सरकारी अनास्थेपोटी आहे तिथेच आहे. मराठा आरक्षण हा विषय महाराष्ट्रातील सगळ्यात जास्त लोकांच्या जिव्हाळ्याचा विषय आहे ! एकूण ३५% मराठ्यांतील मोजके ५ ते १०% श्रीमंत, बागाईतदार, राजकारणी, सहकार-शिक्षण सम्राट इत्यादी सोडले तर इतर भूमिहीन, अल्पभूधारक, कष्टकरी, शेतमजूर, हमाल, माथाडी, कामगार, रिक्षाचालक, घरेलू काम करणारे, हातावर पोट असणारे आदी समाजातील मुला-मुलींच्या भवितव्यासाठी लढायचे आहे.

मराठा क्रांती मोर्चात आम्ही सामाजिक भान काय असते हे जगाला दाखवलंय. आत्ता ५ जूनला बीड येथे निघणाऱ्या मराठा क्रांती संघर्ष मोर्चात सर्व कोरोना विषयक नियमांचे काटेकोर पालन करून परत एक एल्गार जगाला दिसेल. मास्क, सोशल डिस्टनसिंग, सॅनिटाइझर इत्यादी आवश्यक त्या साधनांचा वापर करीत हा मोर्चा निघणार आहे. हा मोर्चा मराठ्यांसाठी न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या सर्व संघटनांसाठी मुक्त तर आहेच पण इतर समाजासही तो मुक्त आहे. ह्या मोर्चास जास्तीतजास्त संख्येने उपस्थित राहण्यासाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यात अनेक ठिकाणी भेटीगाठी चालू असून विविध संघटनांचे प्रमुख, सकल मराठा समाज पदाधिकारी, अनेक क्षेत्रांतील मान्यवर , विविध समविचारी संघटना ह्यांच्याशी चर्चा सुरु आहे. शिवसंग्रामचे जिल्हा सरचिटणीस अनंत देशमुख, कार्याध्यक्ष शंकरराव थोरवे, उपाध्यक्ष आप्पा सत्वे जिल्हा सदस्य रमेश मते, ऋषिकांत पोतदार आणि ईतर पदाधिकारी हा मोर्चा यशस्वी होण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत असेही शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष अविनाश सावंत ह्यांनी शेवटी सांगितले.

## आई-वडिलांना शिवीगाळ आणि मारहाण करून घराबाहेर काढण्याची धमकी, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आई-वडिलांचे पालन पोषण न करता किरकोळ कारणांवरून वेळोवेळी मारहाण शिवीगाळ आणि घरातून बाहेर काढण्याची धमकी दिल्याप्रकरणी मुलगा आणि सून यांच्याविरोधात तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज मनोहरलाल कुंडलिया (वय ६८) ह्या महिला इंडियाबुल्स ग्रीन कोन येथे पती मनोहरलाल (७५) यांच्या सोबत राहतात. २००२ मध्ये राज कुंडलीया यांचे पती रेल्वेमध्ये नोकरीत असताना मुलगा अविनाश सिंग याने सानपाडा येथे रुम घेण्यासाठी त्यांच्याकडून चार लाख रुपये घेतले. खारघर रेल्वे विहार येथील रूम अविनाशने २००६ मध्ये विकून टाकली. २०२० मध्ये राज कुंडलिया याना आणि त्यांचे पती मनोहरलाल याना त्यांचा मुलगा अविनाश सिंग व सून सोनी हे अपमानास्पद वागणूक देऊ लागले.

घरातून बाहेर काढण्याची धमकी दिली. आणि मारहाण करू लागले. त्यामुळे आई वडिलांचे पालन पोषण न करता त्यांना वेळोवेळी मारहाण, शिवीगाळ केल्या प्रकरणी मुलगा आणि सून विरुद्ध तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

## तौक्ते चक्रीवादळाने गुरांच्या वैरणीचा प्रश्न ऐरणीवर

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

तौक्ते चक्री वादळाने पाली सुधागड सह शेतकरी, मच्छिमार, बागायतदार व नागरिकांची घरे, बागा, गुरांचे गोठे, पिके आदींची मोठी वित्तहानी झाली. जिल्ह्यात साधारण २२०० हेक्टर क्षेत्रावर उन्हाळी भात शेती केली जाते. यंदा त्योक्ते वादळाने उन्हाळी भातशेतीला फटका बसला आहे. साधारणपणे २४३ हेक्टरवरील भात पिकांच्या नुकसान झाले आहे. याबरोबरच पावसामुळे पेंढा भिजून खराब झाला आहे. त्यामुळे गुरांच्या वैरणीचा प्रश्न निर्माण झाला आहे. पेंढ्याची एक गंजी ४ रुपयांवरून ५ ते ६ रुपये झाली आहे.



जिल्ह्यात सुधागड, माणगाव, रसायनी, अलिबाग, पेण, कर्जत, महाड, मुरुड व रोहा आदी विविध ठिकाणी उन्हाळी भातशेती केली जाते. हमखास पाणी, पोषक वाता-वरण, शेतीची योग्य मशागत आणि हवामानाची साथ यामुळे उन्हाळी भात शेती मधून शेतकऱ्यास हुकमी पिक मिळते. पावसाळ्यातील शेतीतून मिळणाऱ्या उत्पादन व उत्पन्ना पेक्षा उन्हाळी शेतीतून अधिक चांगले उत्पादन व उत्पन्न मिळते. मात्र यंदा हातातोंडाशी आलेले पीक त्योक्ते वादळ व पावसाने हिरावून नेले आहे. पेंढा भिजून खराब झाल्याने गुरांना खाण्यास काय द्यावे अशी चिंता गौळमाळ येथील शेतकरी मालू कोकरे यांनी व्यक्त केली आहे.

## रुग्णाला देण्यात आलेले लाखो रुपयाचे बिल शिवसेनेने केले माफ

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या मावळ्यांना शिकवण देताना ८०% समाज कारण आणि २०% राजकारण या ध्येय धोरणाचे आचरण करताना शिवसेना उप महानगर प्रमुख लिलाधर भोईर यांनी खांदा वसाहतीमधील अष्टविनायक हॉस्पिटल यांच्यामार्फत रुग्णाला देण्यात आलेल्या बिलाची मोठी रक्क माफ करून घेण्यात आली आहे. यासाठी माजी सरपंच न्हावे नंदकिशोर भोईर यांनी या संदर्भात लिलाधर भोईर यांच्या संपर्क साधला होता.

खर तर या रूग्णाच्या नातेवाईकाने १ लाख डीपॉझीट दिले होते, ३ लाख ३० हजार पॉलीसीमधून इन्शुरन्स झाला होता. २,१४,७८५ रुचे मेडिसीन आणले होते म्हणजे ६, ४४, ७८५ रू बिल देवू केले होते. तरी पण हॉस्पिटल मॅनेजमेन्ट रुग्णाच्या नातेवाईकाकडून दोन दिवसापासुन दोन लाख रूपये भरा म्हणून तगादा लावला होता. शेवटी उप तालुका प्रमुख हनुमान भोईर यांनी शिवसेनेचे उप महनगर प्रमुख लिलाधर भोईर यांच्याशी संपर्क साधून रुग्णाच्या बिला संदर्भात माहिती दिली. तातडीने लिलाधर भोईर यांनी अष्टविनायक हॉस्पिटलच्या व्यवस्थापनाशी संपर्क साधून त्यांना धारेवर धरले. त्यांना व्यवस्थापनाने आपली चुक मान्य करत एकही रुपयाची मागणी न करता बिल माफत केले.

## लग्न समारंभाला दोनशे ते अडीचशे लोकांची गर्दी, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून लग्नसमारंभाला दोनशे ते अडीचशे लोकांची गर्दी केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात नवरदेवाचे वडील आणि नवरीचे वडील यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उेींळव-१९ या रोगाचा प्रसार टाळण्यासाठी शासनाने अनेक प्रतिबंधक उपाय योजना लागू केल्या आहेत. शासनाकडून लग्नसमारंभाला परवानगी घेऊन मोजक्याच लोकांमध्ये लग्न करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. मात्र कामोठे पोलिस ठाण्याच्या हद्दीत मराठी शाळेजवळ, कामोठे गाव, सेक्टर १४ याठिकाणी पोलीस पेट्रोलिंग सुरू असताना दोनशे ते अडीचशे लोकांची गर्दी लग्नसमारंभाला दिसून आली.

यावेळी पोलिसांनी लग्न समारंभाची परवानगी घेतली का याची विचारणा केली असता कोणतीही परवानगी घेतली नसल्याचे नवरीचे वडील धनाजी नागाव गोवारी (वय ४९) आणि नवरदेवाचे वडील शरद केणी (राहणार काळुंद्रे) यांनी सांगितले. कोरोना विषाणूचा संसर्ग झाल्यास मानवी जीविताला धोका उत्पन्न होऊ शकतो हे माहीत असताना देखील विनापरवाना लग्न समारंभ करता दोनशे ते अडीचशे व्यक्ती एकत्र मिळून आल्याने दोघांविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## न्यू व्हिजन कॉलेजचे विद्यार्थी भविष्यात क्लास वन अधिकारी होतील : मंगेश नेने

**दै.रायगड नगरी । पेण**

शिक्षकांची पंढरी म्हणून ओळख असलेल्या पेण तालुक्यात केवळ पदवी पर्यंतचे शिक्षण घेणारे कॉलेज आहेत. यामुळे अनेक विद्यार्थीही पदवीधारकच झालेत. अनेक शिक्षक-शिक्षिका तयार झाल्या आहेत. मात्र फार कमी विद्यार्थी विविध क्षेत्रात अधिकारी म्हणून होऊ शकले. म्हणून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीकरीता पेण मध्येच पुढील शिक्षण मिळविण्यासाठी न्यू व्हिजन महाविद्यालयाची स्थापना करण्यात येत आली आहे. याच माध्यमातून पेण व परिसरातील विद्यार्थी यू.पी.एससी, एम.पी.एससी, पी.एचडी, डिग्री डिप्लोमा सारखे शिक्षण घेणार असल्याचे वक्तव्य महाविद्यालयाच्या कार्यालयाचे उद्घाटन प्रसंगी पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने यांनी केले.



यावेळी न्यू व्हिजन एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष राजू पिचीका, उद्योजक तथा संचालक रशाद मुजावर, सुजित काठे, मिलिंद कांबळे, संचालिका प्रतिक्षा कदम, निता रामधरणे, गौरव रामधरणे, प्रणाली कांबळे आदी संचालक पदाधिकारी उपस्थित होते. बाहेर जाऊन अतिरिक्त खर्च करून शिक्षण घ्यावे लागते म्हणून अनेक विद्यार्थ्यांचे शिक्षण अर्धवट राहिलेले आहे. त्यामुळे आपल्याकडे अशा विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या माध्यमातून पाच टक्के निधी त्यांच्यासाठी वापरता येईल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. तर या महाविद्यालयातील शिक्षक हे उच्च शिक्षित असणार आहेत. तसेच शिक्षणाबरोबरच स्पर्धा परीक्षा, इंटरनेट तसेच क्रिडा विषयक मार्गदर्शन करण्यात येणार असल्याची माहिती संचालिका निता रामधरणे यांनी दिली.

## माथेरान नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहायता निधीकडे सुपूर्द

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गरजवंत रुग्णांना मदत म्हणून माथेरान नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी आपला एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहायता निधी म्हणून सुपूर्द केला आहे.



जवळपास एकसष्ठ हजार नऊशे सहासष्ठ रुपये एवढी रक्कम मुख्याधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांनी धनादेशाद्वारे मुख्यमंत्री कार्यालयाकडे सुपूर्द केले आहेत. यावेळी कार्यालय अधीक्षक रणजीत कांबळे, लिपिक नरेंद्र धनावडे, लेखापाल अंकुश इचके, स्वच्छता निरीक्षक अभिमन्यू येळवंडे, नगरपरिषद अभियंता स्वागत बिरंबोळे, लिपिक राजेश रांजणे, ज्ञानेश्वर सदगीर यांसह अन्य कर्मचारी वर्ग उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.जवाहर एस.देवानी रा.पनवेल यांनी खालील वर्णनाची शेती जमीन मिळकत विकत घेण्याबाबत शेतकऱ्यांसोबत बोलणी करून विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : भिंगार, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| भिंगार | १६३ | १ | ०-११-० | २.३१ |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींना वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत आपल्या हक्क, हितसंबधाचे स्वरुप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न झाल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी, रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणाार नाहीत.

पनवेल
दि.२६/०५/२०२१

सही/-
विनोद जी.ठाणगे
ॲडव्होकेट व नोटरी
शॉप नं.१००, पहिला मजला,
म्युन्सिपल शॉपिंग कॉम्प्लेक्स, वासुदेव
बळवंत फडके नाट्यगृहाच्या मागे,
पनवेल-४१०२०६, जि.रायगड

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत / करारनामा करून प्रस्ताविक जमीन मालक १) श्री.पांडुरंग धुलाजी करमेलकर, २) सौ.सुमन शिवराम पालकर या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : चिंचवली तर्फे वाजे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | स.नं./ हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| चिंचवली तर्फे वाजे | ३२ | ०-२६-०० | ०.५३ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर, कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधीतांचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२९/०५/२०२१

सही/-
ॲड.महेंद्र अनंता पाटील
शॉप नं.१०९, पनवेल महानगरपालिका
कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, ता.पनवेल,
जि.रायगड ४१०२०६. मो.नं.८८९८०४४६७८

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत माझे अशिलांने कायम खरेदीखत करून प्रस्ताविक जमीन मालक श्री.रामदास गोपाळ पाटील या जमीन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरी सदर जमीन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.**

**मौजे : मोहो, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | गट क्रमांक /सर्व्हे नं. | उपविभाग / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| मोहो | २४ | १/अ | ०-१५-४० पैकी ० हे-१० आर-२७ चौ. मी.सामाईक क्षेत्रापैंकी ० हे-०५ आर-१३ प्रति अविभक्त हिस्सा | ०२-४६ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर, कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार-मदार, गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधीतांचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

पनवेल
दि.२९/०५/२०२१

सही/-
ॲड.श्री.दिपक आर.शेळके
शॉप नं.१०९, पनवेल महानगरपालिका
कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, ता.पनवेल,
जि.रायगड. मो.नं.९८२०७९५६०५

# संक्षिप्त...

## दोन मोटार सायकलची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून दोन मोटार सायकलची चोरी झाल्याने वाहन चालकांमध्ये भितीयुक्त वातावरण पसरले आहे.

शंकर मेनन यांची त्यांची २० हजार रुपये किंमतीची होंडा कंपनीची काळ्या रंगाची ॲक्टीव्हा एमएच-४६-एके-०३५८ ही पनवेल रेल्वे स्टेशन पश्चिम बाजूस उभी करून ठेवली असता अज्ञात चोरट्यांनी सदर गाडी चोरुन नेली आहे. तर दुसऱ्या घटनेत सुनील भोईर यांनी त्यांची ८० हजार रुपये किंमतीची बजाज कंपनीची केटीएम १२५ ड्युक मोटार सायकल क्र.एमएच-४६-बीटी-९४६९ ही राहत्या घरासमोर भोईरवाडा घोटगाव येथे उभी करून ठेवली असता सदर गाडीची चोरी करण्यात आली आहे. याबाबत पनवेल शहर पोलीस ठाणे व तळोजा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

## नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, मांडलासाठी मौजे तळवली येथील शासकीय जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

मुरुड तालुक्यातील नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, मांडला या इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे तळवली ता.मुरुड येथील गट नं.३७३, क्षेत्र ०-२१-०० पैकी ०-०५-०० हे.आर. ही जमीन महसूल मुक्त व सारामाफीने मौजे तळवली, ता.मुरुड येथील जागा नवीन प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, मांडला करिता पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

## शैक्षणिक संस्थांच्या शिक्षण शुल्का बाबत राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस आक्रमक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पालकांना आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क भरणे जिकरीचे झाले आहे. शैक्षणिक संस्था मात्र कोणत्याही प्रकारची तडजोड करायला तयार नाही. सर्वोच्च न्यायालयाने निर्देश देऊन ही शिक्षण संस्था आपल्या शुल्का मध्ये एक रुपयाही कमी करण्यास तयार नाही. ज्या सुविधा गेल्या वर्षभर वापरल्या नाहीत त्या सुविधांचे पण शुल्क मागील वर्षी शिक्षण संस्थांनी वसूल केले. संकटाच्या काळामध्ये शिक्षणासारख्या पवित्र व्यवसायामध्ये सुद्धा संस्था आपला नफा सोडायला तयार नाहीत. शिक्षण संस्थांच्या या आडमुठेपणाच्या धोरणाच्या विरोधात आता राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस मैदानात उतरली आहे. राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेशचे प्रदेशाध्यक्ष सुनिल गव्हाणे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण राज्यभर एक पाऊल विद्यार्थ्यांसाठी हि मोहीम सुरू करण्यात आली आहे.

# श्रीवर्धनमध्ये होम आयसोलेशन होणार का बंद ? ग्रामीण भागात होम आयसोलेशनमुळे रुग्णात वाढ

**दै.रायगड नगरी । दिघी**

श्रीवर्धन तालुक्यामध्ये दिवसागणिक आठ ते दहा कोरोनाबाधित रुग्ण संख्येने वाढ होत आहे. याला आळा घालण्यासाठी शासनाच्या आदेशानुसार कोरोना बाधित रुग्णांना आता कोरोना केअर सेंटर आणि संबंधित कोविड रुग्णालयातच उपचार घेणे बंधनकारक आहे. मात्र, येथील रुग्ण होम आयसोलेशनमध्ये उपचार घेत असल्याने कोरोना संसर्ग वाढत असल्याचे समोर येत आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागातून कोरोनाचे रुग्ण घरीच उपचार घेत आहेत. यातून कोरोना संसर्ग पुन्हा वाढू नये यासाठी शासनाच्या आदेशानुसार जिल्हा प्रशासनातर्फे आता कोरोनाचे सौम्य लक्षणे असलेल्या रुग्णांनी कोविड सेंटरमध्ये उपचार घ्यावे असे निर्देश देण्यात आले आहेत. असे असताना देखील सद्यस्थितीत तालुक्यातील १०१ सौम्य लक्षणे असलेले कोरोना रुग्ण हे घरीच राहून उपचार घेत आहेत. तर आराठी येथील कोविड सेंटरमध्ये २ रुग्ण उपचार घेत आहेत. त्यामुळे संभाव्य भविष्यात संसर्गाचे समूळ उच्चाटन करणे प्रशासनापुढे अशक्य बनले आहे.

> सर्वच घटकांनी कोरोना संसर्गाला घाबरून न जाता उपचारासाठी पुढे यावे. कोरोना रूग्ण बरे होतात. रुग्नालयात ऑक्सिजन ची पुरेशी उपलब्धतता आहे. तसेच कोविड सेंटरमध्ये सुविधा देण्यात येत आहेत. मात्र, रुग्ण काळजी न घेता खोटे कारण पुढे करून घरी पळ काढत आहेत. अशा रुग्णांचा गर्दीच्या ठिकाणी वावर होऊन कोरोना संसर्गाचा फैलाव होत आहे. लवकरच संबंधित विभागाशी संपर्क साधला जाईल व प्रशासनाकडून होम आयसोलेशन बंद केले जाईल.
>
> **- डॉ मधुकर ढवळे, वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय श्रीवर्धन.**

घरीच उपचार घेणाऱ्या रुग्णांवर काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. मात्र, गावागावातुन याकडे दुर्लक्ष होत असून संसर्ग वाढत असल्याची माहिती समोर येत आहे. प्रशासनाने कठोर निर्बंध लागू केले आहेत. यामध्ये ग्रामीण भागातील अनेक रुग्ण हे उपचारासाठी रुग्णालयात पोहचत नाहीत आणि घरीच उपचार घेत असल्याचे निदर्शनास येत आहे. त्यांना उपचारासाठी सुविधा नसताना होम आयसोलेशनची मुभा देण्यात येत आहे.

तालुक्यातील आराठी येथे कोविड सेंटर आहे. याठिकाणी कोरोना रुग्णांसाठी ४० बेड ची सुविधा करण्यात आली आहे. मात्र, होम आयसोलेशनमुळे सद्या येथे २ रुग्ण उपचार घेत असून कोविड सेंटर रिकामे आहे. ग्रामपंचायत हद्दीत १५ वित्त आयोगातून कोविड सेंटर साठी २५ टक्के निधी खर्च करण्याचा अधिकार शासनाकडून ग्रामपंचायतीला मिळाला असून सौम्य लक्षणे असणाऱ्या रुग्णांचा उपचार या कोविड सेंटर मध्ये करून गावागावातील कोरोना प्रसार रोखण्यात येईल. गुरुवारपर्यंत (ता.२८) तालुक्यात ९४८ कोरोनाबाधित रूग्ण आढळून आले आहेत. ७७५ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. सद्या १२७रूग्ण उपचार घेत आहेत. आतापर्यंत ४६ जणांचा कोरोनाने मृत्यू झाला आहे. या महिन्यात रुग्ण वाढ होत असून कोरोना संसर्गाने पुन्हा उसळी घेतली आहे.

> कोरोना रुग्ण वाढ होत असल्याने दिवेआगर ग्रामपंचायतच्या कोविड कमिटी मार्फत स्थानिक महसूल विभागाशी बैठक घेण्यात आली. यामध्ये होम आयसोलेशन मध्ये असणाऱ्या कोरोना बाधित रुग्णामुळे प्रादुर्भाव वाढ होत आहे. याशिवाय रूग्णांना उपचार मिळत नसल्याची माहिती देण्यात आली.
>
> **- उदय बापट, सरपंच दिवेआगर.**
>
> **ग्रामपंचायतीला अधिकार -**

# माथेरानमध्ये अश्व खाद्य वाटपासाठी पोलिसांचा पुढाकार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

कोरोनाने प्रभावित माथेरानच्या पर्यटनास बंदी झाल्यामुळे येथील व्यावसायिक अडचणीत आलेले आहेत त्यात येथील अश्वाचालकांना त्याचा फटका जास्त प्रमाणात बसला होता. तशा बातम्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये झळकल्यानंतर घोड्यांसाठी मदतीचा ओघ सुरू झाला होता. त्यात आता येथील पोलिसांचा ही हातभार लागला असून उमंग ह्या सामाजिक संस्था व कर्जत माथेरान पोलिसांच्या वतीने येथील अश्वचालकांना व येथील माकडांना चाऱ्याचे वाटप कर्जतचे डी वाय एस पी श्री अनिल घेरडीकर यांच्या हस्ते माथेरान मध्ये वाटप करण्यात आले.



माथेरान पोलीस स्टेशन येथे काही वर्षांपूर्वी ब्लॅकी व ब्राऊनी हे दोन घोडे पोलिसांसाठी कार्यरत होते. त्यामुळे पोलिसांसाठी घोडे हे नेहमीच जिव्हाळ्याचे राहिले आहेत. लॉकडाऊन मध्ये व्यवसाय बंद पडल्याने ह्या मुक्या जनावरांना पौष्टिक चारा मिळावा ह्या करिता डी वाय एस पी श्री अनिल घेरडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान मध्ये कार्यरत असलेले पोलीस महेंद्र राठोड यांच्या प्रयत्नाने डोंबिवली येथील सामाजिक संस्था उमंग यांच्या समवेत येथील स्थानिक अश्व चालकांना घोड्यांसाठी पौष्टिक चारा व माकडांसाठी खाद्य उपलब्ध करण्यात आले व त्याचे वाटप माथेरांमधील ४६० अश्व चालकांना डी वाय एस पी अनिल घेरडीकर यांच्या हस्ते समान करण्यात आले. ह्यावेळी माथेरानचे एपीआय प्रशांत काळे पोलीस महेंद्र राठोड, पोलीस पाटील अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशाताई कदम शैलेश शिंदे व उमंग फाउंडेशनचे संकेत तांबे अध्यक्ष वैभव रत्नपारखी सचिव स्वप्नील तांबे खजिनदार व सर्व अश्वचालक उपस्थित होते ह्यावेळी वाटप करताना सामाजिक अंतर ठेवून वाटप करण्यात आले.

> लॉकडाऊनमुळे माथेरानचे पर्यटन बंद आहे त्यामुळे येथील अश्वाचालकांना मदतीची गरज आहे व ही आमच्याकडून छोटीशी मदत आहे पण ह्यापुढे जाऊन अधिकाधिक मदत अश्व चालकांना मिळवून देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत.
>
> **अनिल घेरडीकर डी वाय एस पी कर्जत**

> माथेरान मधील पोलीस महेंद्र राठोड यांनी माथेरानच्या घोड्यांना मदतीची गरज असल्याचे आव्हाहन केले होते. त्यामुळे तातडीने आम्ही उमंग फाउंडेशनच्या वतीने येथील घोड्यांना माकडांसाठी खाद्य उपलब्ध केले आहे.
>
> **संकेत तांबे अध्यक्ष उमंग फाउंडेशन मुंबई**

# मुरुडमध्ये समुद्रकिनारी सापडला मृत डॉल्फिन, नागरिकांनी व्यक्त केली हळहळ

**दै.रायगड नगरी । मुरुड**

कोकणातील किनारपट्टीवरून डॉल्फिन या सस्तन प्रजातीतील मास्याचे दर्शन नेहमीच घडत असते, त्यांची संख्याही भरपूर प्रमाणात आहे. मुरुड जंजिरा समुद्रकिनाऱ्यावरूनही डॉल्फिन मास्याचे पाण्यातून हवेत उडी मारताना चे विलोभनीय दृश्य पर्यटकांनी तसेच स्थानिक नागरिकांनी अनेक वेळा पाहिले आहे. आठ दिवसांपूर्वी मुरुडमधील ऋषिकेश बैले या युवकाला समुद्रकिनारी पाच फुटी दोन जिवंत डॉल्फिन आढळून आले होते त्यांना त्यांनी समुद्रात सुखरूप सोडले ही घटना ताजी असतानाच शुक्रवारी सायंकाळी सुमारे चार फूट लांबीचा मृत डॉल्फिन मासा मुरुड समुद्र किनारी आढळून आला आहे.

या निपचीत पडलेल्या डॉल्फिन कडे फिरायला आलेले नागरिक हळहळ व्यक्त करीत होते, बऱ्याच वेळा मृत डॉल्फिन मासे संपूर्ण कोकण किनारपट्टीवर आढळून येत आहेत ही अत्यंत दुर्दैवी बाब असून त्यांचे योग्य संवर्धन होणे गरजेचे आहे. तसेच समुद्रातील प्रदूषण, प्लास्टिकचे विष, बोटींच्या धडकेमुळे, मासेमारीच्या जाळ्यात अडकल्याने इत्यादी अनेक कारणांमुळे डॉल्फिन मृत अवस्थेत आढळत असल्याचे मत पक्षी, प्राणी व मत्स्यप्रेमी संदीप घरत यांनी व्यक्त केले.



# जावळे, शिवकर, सावळे, जाताडे येथे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



**दै.रायगड नगरी । पनवेल**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७० वा वाढदिवस आहे. वैश्विक महामारी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या वाढदिवसानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भारतीय जनता पक्ष पनवेलतर्फे पनवेल तालुका व महानगरपालिका क्षेत्रातील गरीब, गरजू नागरिकांना सामाजिक बांधिलकीतून जीवनावश्यक वस्तूंचे वाटप कार्यक्रम सुरु आहेत. त्या अनुषंगाने जावळे, शिवकर, सावळे, जाताडे येथील नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या सुयोग्य नियोजनातून तालुक्यातील गावागावांमध्ये गरजूंना अन्नधान्याचे वाटप करण्यात येत आहे.

# शिवसेनेच्या माध्यमातून पनवेल उपजिल्हा रुग्णालयाला ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर

## खा.श्रीरंग बारणे, बबनदादा पाटील यांच्या उपस्थितीत ४ ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर भेट

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्यात ऑक्सिजनचा तुटवडा लक्षात घेता महाविकास आघाडी सरकार निरनिराळ्या पद्धतीने लोकसेवा करताना दिसत आहे. आज पनवेल उपजिल्हा रुग्णालयाला मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग उर्फ आप्पा बारणे यांनी ४ ऑक्सिजन कॉन्सट्रेटर भेट देऊन येथील वैद्यकीय सेवेला हातभार लावला आहे. यावेळी त्यांच्यासोबत रायगड जिल्हा प्रमुख सल्लागार बबनदादा पाटील, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील, पनवेल महानगरप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, तालुका संघटक रामदास पाटील, अवचित राउत, पराग मोहिते यांच्यासह वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन सकपाळ, डॉ.बाबासाहेब काळे, डॉ.प्रमोद पाटील आदींसह शिवसेनेचे पदाधिकारी तसेच वैद्यकीय कर्मचारी उपस्थित होते.



यावेळी बोलताना खा.बारणे यांनी सांगितले, राज्यसरकारची जबाबदारी स्विकारत असताना राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या आदेशानुसार कोरोना रुग्णांच्या उपचारासाठी राज्यातील शिवसेनेच्या प्रत्येक खासदार, आमदार, जिल्हाप्रमुख यांच्यावर जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक नगरपालिका, महानगरपालिकांना भेटी देऊन तिथे असणाऱ्या कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. आज ज्या ज्या रुग्णालयांमध्ये उपचार घेणारे रुग्ण आहेत त्यांच्याकडे वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून कशा पद्धतीने सहकार्य मिळत आहे याची स्वतः चौकशी करून त्याबाबत आढावा घेतला. यावेळी प्रामुख्याने पनवेल उपजिल्हा रुग्णालयाचे स्वच्छता आणि लोकसेवेबाबत अधिकारी व कर्मचारी यांचे खा.बारणे यांनी विशेष अभिनंदन केले.

# सुधागड पावसाळावाडीचा रस्ता सुस्थितीत कधी येणार? ग्रामस्थांचा सवाल

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

दर्जेदार व सुसज्ज रस्ते हे नेहमीच सर्वांगीण विकासाला चालना देतात. मात्र सुधागडातील अनेक रस्ते उपेक्षित आहेत. सुधागड तालुका हा ग्रामीण भागाने व्यापलेला असून अनेक गावांना, वाड्यांना, वस्त्यांना जोडणारा बारमाही रस्ता नसल्याचे दिसून येत आहे. आजही अनेक गावे बारमाही दळणवळणाची साधने नसल्यामुळे त्रस्त आहेत. असेच एक गाव म्हणजे माणगाव बुद्रुक ग्रामपंचायत हद्दीतील पावसाळावाडी गाव. या गावाला अजूनही बारमाही दळणवळणासाठी योग्य रस्ता नाही. अनेक वेळा आंदोलने करून, निवेदने देऊन, एवढेच नव्हे तर निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याची घोषणा करून जेमतेम एक किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित दीड ते दोन किलोमीटरचा रस्ता अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. दुचाकीस्वार देखील या रस्त्याने नीटपणे प्रवास करू शकत नाहीत. अनेकदा प्रवास करीत असताना दुचाकीस्वारांचा अपघात झालेला आहे. अनेक ग्रामस्थ या अपघातामुळे छोट्या मोठ्या प्रमाणावर जखमी झाले आहेत.



पावसाळावाडी या गावात आदिवासी बांधव व मराठा बांधव राहत आहेत. रस्ता खराब असल्यामुळे या गावातील आजारी रुग्णांना, महिलांना, विद्यार्थ्यांना व कामानिमित्त बाहेर जाणाऱ्या दुचाकीस्वारांना त्रास सहन करावा लागत आहे. आमचा रस्ता कधी होणार असा सवाल ग्रामस्थ विचारताना दिसत आहेत. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शासन दरबारी दाद मागता येत नाही म्हणून येथील ग्रामस्थांनी पत्रकारांना बोलवून आपली व्यथा मांडली. रस्त्याची दयनीय अवस्था दाखवून आमच्या गावाला जोडणारा हा रस्ता लवकरात लवकर व्हावा अशी मागणी पावसाळीवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

यावेळी माणगाव बुद्रुक ग्रामपंचायतीचे सदस्य सोनू छबू हिलम, रमेश साळुंके, उमेश खेरटकर, बबन शिंदे, अनिल खेरटकर , शरद माने, सुनिल खेरटकर, तुषार खेरटकर, यशवंत खेरटकर, दत्तु हिलम, मारुती वाघमारे, संतोष शेदवल, हिरामण पवार, संतोष पवार, प्रेम सावंत, हिरामण जाधव, सिताराम शिंदे, प्रशांत शेदवल, विजय वाघमारे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

# जिल्हाधिकाऱ्यांची बोर्लीपंचतन प्रा. आरोग्य केंद्राला भेट

**दै.रायगड नगरी । दिघी**

बोर्लीपंचतन येथील प्रा. आरोग्य केंद्राला जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी भेट दिली. यावेळी लसीकरण करण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या तर ग्रामपंचायत कडून कोरोना नियंत्रणात आणण्यासाठी आवश्यकता काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद सदस्या सायली तोंडलेकर, सरपंच नम्रता गाणेकर, तहसीलदार सचिन गोसावी, वैद्यकीय अधिकारी डॉ सुरज तडवी व इतर मान्यवर उपस्थित होते.

